# भाकरीची भूक अस्वस्थ करणारी असल्यामुळे क्रांती घडू शकते-ज्येष्ठ अर्थतज्ञ प्रा .प्रमोद शहा



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- भाकरीची भूक ही सर्वात अस्वस्थ करणारी असते,त्यामधून तरुणांमधील अस्वस्थता वाढून क्रांती ही होऊ शकते. लोकसंख्या वाढ , वाढते प्रदूषण ,वाढते दारिद्र्य, वाढता सार्वजनिक खर्च, लाच लुचपत दिरंगाई ,भ्रष्टाचार, या गोष्टी भारताच्या आर्थिक प्रगतीतील अडथळे आहेत असे प्रतिपादन कुर्डूवाडी येथील ज्येष्ठ अर्थतज्ञ प्रा .प्रमोद शहा यांनी रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात केले.

ते पुढे म्हणाले की , भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील वाढती आव्हाने पेलण्यासाठी तरुणांनी सज्ज व्हावे असेही ते यावेळी म्हणाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संदीप देशमुख हे होते. त्यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना. देशाला विकसित करावयाचे असेल तर स्वतः विद्यार्थ्यांनी आपले अर्थशास्त्र जाणून घेतले पाहिजे असे ते म्हणाले.

सदर कार्यक्रमाचे प्रस्ताविक अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. मारुती अभिमान लोंढे यांनी केले तर आभार अर्थशास्त्राचे प्रा. डॉ. दयानंद हाके यांनी मानले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी निकिता माने हिने केले.

सदर कार्यक्रमासाठी के.एन.भिसे महाविद्यालयाचे प्रा.डॉ. दत्तात्रेय कदम, शिवाजी महाविद्यालय कळब येथील प्रा. अभिमान ढाणे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. डॉ.मंगेश भोसले, प्रा.डॉ.बालाजी गुंड , प्रा.विवेकानंद चव्हाण, प्रा. डॉ. अरविंद हंगरगेकर, व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयातील सर्व गुरुदेव कार्यकर्ते यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

सदर कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संदीप देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

# कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्रासाठी धाराशिवमध्ये जनजागृतीचा ध्यास

धाराशिव (अंजुम शेख) राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत जिल्हा धाराशिवच्या वतीने कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र ही महत्त्वाकांक्षी मोहीम संपूर्ण जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत तेरणा नगर, ढोकी येथील भैरवनाथ साखर कारखाना लिमिटेड येथे विशेष जनजागृती व तपासणी अभियान पार पडले.



या उपक्रमात कारखान्यातील सर्व कामगारांना कुष्ठरोगाबाबत समाजात पसरलेल्या गैरसमजुती दूर करण्यासाठी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. कुष्ठरोग हा पूर्णपणे बरा होणारा आजार असून सुरुवातीच्या अवस्थेत उपचार घेतल्यास कोणतीही भीती बाळगण्याचे कारण नसल्याचे आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. अंगावर चट्टे, सुन्नपणा किंवा त्वचेतील बदल आढळल्यास त्वरित जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात तपासणी करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले.

या कार्यक्रमाला श्री. डोंगरे जी.आर. (छच-) श्री. नागलोटे एम.एस. (कुष्ठरोग तंत्रज्ञ) श्री. बी.बी. पवार (आरोग्य सेवक) श्री. शेख ए.एम. (आरोग्य सेवक) यांची प्रमुख उपस्थिती होती.

कारखाना परिसरात आरोग्य जनजागृती फलक लावून प्रत्यक्ष संवादातून कामगारांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. कुष्ठरोग लपवू नका, उपचार घ्या आणि निरोगी राहा हा संदेश देत आरोग्य विभागाने सामाजिक जबाबदारीची जाणीव करून दिली.

धाराशिव जिल्ह्यातील हा उपक्रम केवळ आरोग्य मोहिम नसून समाजातील भीती व कलंक दूर करण्याचा ठोस प्रयत्न असल्याचे मानले जात आहे. कुष्ठमुक्त महाराष्ट्राच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल ठरत आहे.

# श्री तुळजाभवानी देवींची सिंहासन पूजा फेब्रुवारी २०२६ ची ऑनलाईन नोंदणी १९ फेब्रुवारीपासून

धाराशिव (जिमाका)- महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी देवीच्या सिंहासन पूजेची मार्च- २०२६ मधील नोंदणी प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार आहे.भाविकांनी अधिकृत संकेतस्थळावरून आपली नोंदणी करावी.असे आवाहन मंदिर संस्थानने केले आहे.

आपल्या राज्यासह आंध्रप्रदेश, कर्नाटक,तेलंगणा आणि इतर राज्यांमधून मोठ्या संख्येने भाविक कुलाचार व कुलधर्मासाठी तुळजापूर येथे येतात.श्री तुळजाभवानी देवीची सिंहासन पूजा ही अत्यंत श्रद्धेने केली जाणारी पूजा असून, नोंदणीसाठी http://shrituljabhavani.org या अधिकृत संकेतस्थळावर 'सिंहासन पूजा पास बुकिंग' या मेन्यूवर क्लिक करून, https://shrituljabhavanimataseva.org या लिंकवर जाऊन नोंदणी करावी.

मार्च महिन्याच्या नोंदणीचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.नोंदणी कालावधी : १९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता ते २३ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजेपर्यंत. प्रथम सोडतीचे ऑनलाईन पेमेंट : २५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता एसएमएसद्वारे कळविण्यात येईल.भाविकांनी प्रथम फेरीचे ऑनलाईन पेमेंट २५ फेब्रुवारी सकाळी ११ ते २६ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजेपर्यंत करावे.

सिंहासन संख्या पूर्ण न झाल्यास ऑनलाईन ड्रॉ पध्दतीने व्दितीय सोडत व भाविकांना पेमेंटसाठी २६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता एसएमएस पाठविण्यात येईल. भाविकांनी व्दितीय फेरीचे ऑनलाईन पेमेंट २६ फेब्रुवारी सकाळी ११ ते २७ फेब्रुवारी सकाळी १० वाजेपर्यंत करता येईल.

प्रथम व द्वितीय फेरीत सिंहासन संख्या पूर्ण न झाल्यास ऑनलाईन ड्रॉ पद्धतीने तृतीय सोडत व भाविकांना पेमेंटसाठी एसएमएस २७ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजतापर्यंत पाठविण्यात येईल. तृतीय फेरीचे ऑनलाईन पेमेंट २७ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते २८ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजेपर्यंत करता येईल.मार्च २०२६ या महिन्यातील अंतीम सिंहासन पूजा बुकींग झाल्याची यादी २८ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता प्रसिद्ध करण्यात येईल.

भाविकांनी वरीलप्रमाणे सिंहासन पूजा नोंदणीचा लाभ घ्यावा.असे आवाहन श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या व्यवस्थापक (प्रशासन) यांनी केले आहे.

# सूर्यनमस्कार स्पर्धेत पोदार इंटरनॅशनल स्कूल धाराशिवच्या मुलींची चमकदार कामगिरी



तेरणा पब्लिक स्कूल धाराशिव येथे आयोजित करण्यात आलेल्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी धाराशिव जिल्हास्तरीय सूर्यनमस्कार प्रशिक्षण व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये पोदार इंटरनॅशनल स्कूल धाराशिवचे विद्यार्थी देखील सहभागी झाले होते. यामध्ये स्कूलच्या चार विद्यार्थिनींनी चमकदार कामगिरी करत विशेष प्राविण्य प्राप्त केले. इयत्ता चौथीची विद्यार्थिनी कुमारी संपत्ती पाटील, पाचवीची कुमारी कादंबरी पाटील, इयत्ता आठवीची कुमारी भाग्यश्री पवार व सायुरी सूर्यवंशी या विद्यार्थिनींनी सूर्यनमस्कार स्पर्धेत चमकदार कामगिरी केल्याबद्दल पदक देऊन गौरविण्यात आले. त्यांच्या या यशाबद्दल स्कूलचे प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासे सर यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या तसेच स्कूलमध्ये देखील त्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी मोठ्या संख्येने विद्यार्थी व पालक वर्ग देखील उपस्थित होता. या स्पर्धेसाठी स्कूलचे क्रीडाशिक्षक श्री विवेक महाजन सर यांनी विशेष अशी मेहनत घेतली.

लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

# मन करा रे प्रसन्न; सकारात्मकतेतच यशाचे गमक - प्रदीप साळुंखे

कळंब (प्रतिनिधी)-मन प्रसन्न असेल तरच जीवनात यशाची दारे उघडतात, असे




प्रतिपादन प्रसिद्ध व्याख्याते प्रदीप साळुंखे यांनी केले. शिव सेवा तालीम संघ यांच्या वतीने आयोजित व्याख्यानमालेत ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.

मन करा रे प्रसन्न या विषयावर मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, भौतिक प्रगतीसोबत तणाव, नैराश्य आणि आत्महत्यांचे प्रमाण वाढत आहे. मनावर नियंत्रण ठेवून जीवनातील दुःखाचे मूळ शोधण्याचा संदेश संत तुकाराम आणि गौतम बुद्ध यांनी दिला होता, याचा संदर्भ देत त्यांनी सकारात्मकता, सेवाभाव आणि चांगल्या कर्मांचे महत्त्व अधोरेखित केले. राग, अहंकार, द्वेष आणि मत्सर टाळून चांगल्या संगतीत राहिल्यास जीवन अधिक यशस्वी होते, असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमास डॉ. माणिकराव डिकले, डॉ. रमेश जाधवर, डॉ. रमेश वाघ, डॉ. निळकंठ चोपणे, डॉ. अभय मनगिरे, डॉ. अमित पाटील, डॉ. अभिजीत लोंढे, डॉ. कोरसाळे, डॉ. कवडे, डॉ. दीपक कुंकुळोल, डॉ. अजित देशमुख, डॉ. काकाणी, डॉ. शिनगारे, डॉ. कल्याणकर, डॉ. बावळे, डॉ. सोनवणे, डॉ. भवर, डॉ. काकडे, डॉ. मुंडडा, प्राचार्य हेमंत भगवान, प्रा. सुनील पवार, अरविंद शिंदे, प्रा. कांबळे सर, प्रा. नरवडे सर आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राचार्य गपाट यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष सुशील तीर्थकर, सचिव मनोज कदम, प्रा. संजय घुले, बापू कदम, शिवाजी कदम, आरेफभाई तांबोळी, विकास गडकर, नितीन गरड, अनिल पवार आदींनी विशेष परिश्रम घेतले.

प्रेरणादायी विचारांनी भरलेल्या या व्याख्यानामुळे उपस्थितांना सकारात्मक दृष्टीकोन स्वीकारण्याची नवी ऊर्जा मिळाल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.

**जिल्हादंडाधिकारी कार्यालय, धाराशिव** (उपचिटणीस शाखा)
मेन रोड, धाराशिव पिनकोड - ४१३५०१ दुरध्वनी क्र. ०२४७२-२२७३०१
Email Id-rdc1osmanabad@gmail.com

जा.क्र २०२५/उपचिटणीस/एमएजी-४/कावि-२८९९/ सिआर-५८ दिनांक :- निम्नस्वाक्षरीत

## जाहिर प्रगटन
## (विस्फोटक नियम २००८ चे नियम १०७)

सर्व नागरिक मौजे कळंब ता. कळंब जि. धाराशिव यांना या जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, मौजे, कळंब ता. कळंब जि. धाराशिव येथील जमीन गट नंबर **९४/अ** मधील प्लॉट नंबर १७ मध्ये **श्री. जयप्रकाश बंकटलाल तापडीया** रा. कळंब ता. कळंब यांनी शोभेची दारू कब्जात ठेवून विक्री (फटाका विक्री) करणेची अनुज्ञाप्ती फॉर्म नंबर २४ विस्फोटक नियम २००८ अन्वये अनुज्ञाप्ती एल ई-५ मिळणेसाठी अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे. प्रस्तावित जागेची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

**१. पूर्व बाजू - गजेंद्र बारटक्के**
**२. पश्चिम बाजू - रस्ता**
**३. दक्षिण बाजू - पुष्पा गोपाळ तापडीया**
**४. उत्तर बाजू - रस्ता**

सदर परवानगीबाबत स्थानिक चौकशीबाबत मा.पोलीस अधीक्षक, धाराशिव/कार्यकारी अभियंता म.रा.वि.वितरण कंपनी, धाराशिव/कार्यकारी दंडाधिकारी, कळंब/कार्यकारी अभियंता, (बांधकाम) जि.प.धाराशिव, यांचेमार्फत झालेली आहे.

तरी, **श्री. जयप्रकाश बंकटलाल तापडीयो रा.कळंब** ता. कळंब यांना मौजे.कळंब ता. कळंब येथील जमीन गट नंबर ९४/अ प्लॉट नंबर १७ मध्ये शोभेची दारू कब्जात ठेवून (फटका विक्री) करणेची अनुज्ञाप्ती फॉर्म नंबर २४ विस्फोटक नियम २००८ अन्वये अनुज्ञाप्ती एल ई-५ ची परवानगी देणेबाबत कोणास **कांही आक्षेप असल्यास, सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाले** पासून **(०८)** दिवसाचे आत समक्ष हजर राहून या कार्यालयास लेखी सादर करावेत. विहित मुदतीत आक्षेप प्राप्त न झालेस पुढील नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

Signed by
Vidyacharan Jagannath Kadavkar
Date:13-02-2026 19:07:50

स्वाक्षरित/-
**(विद्याचरण कडवकर)**
**अपर जिल्हादंडाधिकारी, धाराशिव.**

**जिमाका/एके/जाहि/१४१**

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649